## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या मंगळवार दि. २६ एप्रिल २०११ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १३८ वी बैठक बुधवार दि.२६ एप्रिल २०११ रोजी सकाळी ११.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. सुभाष हजारे,भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| २) | मा. श्री.प्र.ल.पाठक | उप सचिव, महाराष्ट्र शासन |
| ३) | मा.डॉ.श्री.ल.पुलकुंडवार | अवर सचिव, महाराष्ट्र शासन |
| ४) | मा.श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ५) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ६) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ७) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ८) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्या |
| ९) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| १०) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| ११) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १२) | मा.श्री.हेमराज शाह | सदस्य |
| १३) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १४) | मा. श्री.तारीक फारुकी | सदस्य |
| १५) | श्री.पी.पी.महिषी,<br>निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |
| १६) | उपकर निर्धारक व संकलक<br>(रिपेअर सेस) महापालिका | निमंत्रक |
| १७) | श्री.ओ.बी.साहू | सह मुख्य अधिकारी |

बैठकीच्या सुरुवातीस सचिव श्री.महिषी यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या १३८ व्या बैठकीत सर्व उपस्थित सन्मा.सदस्यांचे हार्दिक स्वागत करुन सर्व सन्मा.सदस्यांना विषयसूची पाठविली असल्याचे सांगून मा. सभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक - १३८.१**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि.११.०३.२०११ रोजी झालेल्या १३७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.०१ ते १७ वर सादर करण्यात आले.

सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनी मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे पुनर्रचित इमारतीतील १८०/२२५ चौ.फूटाच्या गाळयांची यादी तसेच १३१ गाळयांच्या यादीमधील जे १७ गाळे वर्ग केले गेले आहेत, त्यांच्या नस्त्या अजूनही मिळाल्या नसल्याबाबत तसेच श्री.मठपती,उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी गेला

महिनाभरात एक दिवस पूर्ण वेळ सन्मा.सदस्यांना देण्याच्या मा.मुख्य अधिकारी यांनी सूचना देवूनही वेळ दिलेली नाही,तसेच गेल्या बैठकीत जी १३१ गाळ्यांची यादी देण्यात आलेली होती ती खोटी आहे, असे सांगून सर्व सन्मा.सदस्यांची दिशाभूल केलेली आहे असे सांगितले.

यावर श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी असे सांगितले की, पुनर्रचित इमारतीतील १८०/२२५ चौ.फूटाच्या रिक्त गाळ्यांची यादी आजच संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याची प्रत सर्व सन्मा.सदस्यांना देण्यात येईल.

यावर मा.मुख्य अधिकारी,दुवपु.मंडळ यांनी श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांना जी माहिती संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे, ती सभागृहात थोडक्यात सांगण्यास सांगितले.

श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली - "दि.०७/०३/२०११ पर्यंत बृहत्सूचीवरुन वितरीत करण्यात आलेले गाळे, अद्याप वितरण करावयाचे २२५ चौ.फूटाचे २३८ निवासी, १४ अनिवासी, एन.ओ.सी.गाळे ५६ तसेच १८० चौ.फूटाचे किंवा त्यापेक्षा लहान निवासी ५६ आणि अनिवासी ३२ गाळे यांची माहिती संकेत स्थळावर टाकण्यात आलेली आहे."

तसेच मा.मुख्य अधिकारी,दुवपु.मंडळ यांनी निवासी कार्यकारी अभियंता यांना अशी विचारणा केली की, जी १३१ गाळ्यांची माहिती गेल्या बैठकीत देण्यात आली होती, ती परिपूर्ण आहे किंवा नाही याची खात्री करुन घेण्यात आली होती का ? यावर निवासी कार्यकारी अभियंता यांनी अशी माहिती दिली की, सहमुख्य अधिकारी यांनी मंडळाच्या बैठकीच्या आदल्या दिवशी सर्व कार्यकारी अभियंता यांची या रिक्त गाळ्यांबाबत बैठक घेतली होती. सर्व कार्यकारी अभियंता यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी दिलेल्या मूळ [redacted] रिक्त सदनिकेंच्या यादीत सुधारणा करुन यादी तयार करण्यात आली होती. यावर सहमुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, सदर बैठकीच्यावेळी श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) हे रजेवर असल्याकारणाने कार्यकारी अभियंत्यांनी दिलेली माहिती संकलित करुन ती तयार करण्यात आली.

तसेच सर्व अधिका-यांना मा.मुख्य अधिकारी यांनी अशा सूचना दिल्या की, बैठकीत सन्मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची माहिती बैठकीचे इतिवृत्त येण्याची वाट न पहाता ~~सयुक्तिक~~ संकलित करणे / त्यावर कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनी असे सांगितले की, मुंबई मंडळास वर्ग करावयाच्या गाळयांच्या यादीमधून जे १७ गाळे वर्ग केले गेले आहेत, त्या १७ गाळयांच्या नस्त्या श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांचेकडे मागितल्याअसता त्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात आलेल्या आहेत असे सांगण्यात आले, हे कितपत खरे आहे. यावर श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी असे सांगितले की, संबंधित कार्यकारी अभियंता यांना सदर नस्त्या त्यांच्या विभागात नेण्याकरीता लेखी कळविलेले आहे.

यावर मा.मुख्य अधिकारी,दुवपु.मंडळ यांनी सहमुख्य अधिकारी यांना त्यांचे दालनात संबधित उपमुख्य अभियंता, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांचेसह सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांचेसमवेत बैठक घेवून त्यांच्या सर्व शंकांचे योग्य ते निरसन करुन त्यांनी मागितलेली माहिती देण्यात यावी, अशा सूचना दिल्या.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी पान क्र.४ वरील परिच्छेदात "क-हाड" इमारत असे चूकीचे टंकलिखित करण्यात आलेले आहे त्याऐवजी "करानी" इमारत आहे असे सूचविले. त्यांनी सूचविल्याप्रमाणे कार्यवृत्तांतात चुकीची दुरुस्ती करण्यात आली.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी पान क्र.५ वरील पहिल्या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे स्ट्रक्चरल ऑडिटचे काय झाले, अशी विचारणा केली. त्यावर मा.मुख्य अधिकारी यांनी स्ट्रक्चरल ऑडिटची कार्यवाही महानगरपालिका करणार आहे, असे सांगितले.

डी.एस.आर. सुधारित बाबत सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी विचारणा केलीअसता सर्व कार्यकारी अभियंता यानी दिलेली माहिती विचारात घेऊन उपमुख्य अभियंता यांनी DSR सुधारित केल्यानंतर मुख्य अभियंता-२/प्रा. यांचेकडे मंजूरीकरीता पाठविण्यात येणार आहे, असे मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी मागच्या बैठकीत पुनर्विकासाचे आयत्यावेळचे विषय घेण्यास कोणत्या सदस्यांचा विरोध होता त्यांच्या नावाचा उल्लेख कार्यवृत्तांमध्ये घेण्यात आला नसल्याचे सांगितले. त्यावर सचिव यांनी सांगितले की, उपस्थित सर्व सन्मा.सदस्यांनी त्या बैठकीत आयत्यावेळचे विषय घेवू नये असे सांगितले होते.

वरील सविस्तर चर्चेअंती कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक - १३८.२ (१)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.
परिमंडळ-१ मधील (अ,सी-१,सी-२,सी-३ विभाग) ३५ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. १९ ते ३३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३८/१२०४**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ३५ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.६,५८,६६,८०३/-(रुपये सहा कोटी,अठ्ठावन्न लक्ष,सहासष्ट हजार,आठशे तीन फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.५,७८,८२,८७०/- (रुपये पाच कोटी, अठ्ठ्याहत्तर लक्ष, ब्याऐंशी हजार, आठशे सत्तर फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३८.२ (२)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-२ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.
परिमंडळ-२ मधील (डी-१,डी-२,डी-३, ग-दक्षिण विभाग) १४ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ३५ ते ४५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३८/१२०५**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १४ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या

कामासाठी रु.३,२७,४४,५१८/-(रुपये तीन कोटी, सत्तावीस लक्ष,चव्वेचाळीस हजार,पाचशे अठरा फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,३६,२०,६१६/- (रुपये एक कोटी, छत्तीस लक्ष, वीस हजार, सहाशे सोळा फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३८.२ (३)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-२ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.
परिमंडळ-२ मधील (डी-१,डी-२,डी-३, ग-दक्षिण विभाग) २६ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ४७ ते ५७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३८/१२०६**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण २६ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.४,४३,०५,१९३/-(रुपये चार कोटी, त्रेचाळीस लक्ष,पाच हजार,एकशे त्र्याण्णव फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.२,९८,४७,३६७/- (रुपये दोन कोटी, अठ्ठयाण्णव लक्ष, सत्तेचाळीस हजार, तिनशे सदुसष्ट फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३८.२ (४)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-३ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.
परिमंडळ-३ मधील (ब,ई-१, ई-२ विभाग) ०५ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ५९ ते ६७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३८/१२०७**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०५ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१,०८,८९,८०२/-(रुपये एक कोटी,आठ लक्ष, एकोणनव्वद हजार,आठशे दोन फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.६०,१६,८४८/- (रुपये साठ लक्ष, सोळा हजार, आठशे अठ्ठेचाळीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३८.२ (५)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-४ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-४ मधील (फ/द,फ/उ ,ग/उ विभाग) ०९ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ६९ ते ७७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३८/१२०८**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०९ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१,९७,४५,४८०/-(रुपये एक कोटी, सत्त्याण्णव लक्ष,पंचेचाळीस हजार,चारशे ऐंशी फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,२२,७३,६७५/- (रुपये एक कोटी, बावीस लक्ष, त्र्याहत्तर हजार, सहाशे पंच्याहत्तर फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३८.३**

विषय - इ.क्र.२९-एच, खोताची वाडी (नारायण मोतीलाल चाळ) या इमारतीस म्हाड अधिनियम कलम ८८(३)(अ) अन्वये जारी करण्यात आलेले प्रमाणपत्र रद्द करण्याची परवानगी मिळण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.७९ ते ८१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

इ.क्र.२९-एच, खोताची वाडी (नारायण मोतीलाल चाळ) या इमारतीस म्हाड अधिनियम कलम ८८(३)(अ) अन्वये जारी करण्यात आलेले प्रमाणपत्र दि.२८/०१/२०११ या तारखेपासून पूर्वलक्षीप्रभावाने रद्द करण्याबाबतच्या प्रस्तावास चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३८/१२०९**

इ.क्र.२९-एच, खोताची वाडी (नारायण मोतीलाल चाळ) या इमारतीस म्हाड अधिनियम कलम ८८(३)(अ) अन्वये जारी करण्यात आलेले प्रमाणपत्र दि.२८/०१/२०११ या तारखेपासून पूर्वलक्षीप्रभावाने रद्द करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**बाब क्रमांक - १३८.४ (१)**

विषय - उपमुख्य अभियंता-परिमंडळ-३ मधील ई-१ व ई-२ विभागांतर्गत जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याबाबत.(कालावधी दि.०१.०२.११ ते दि.३१.०३.२०१२)

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ८३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३८/१२१०**

उपमुख्य अभियंता परिमंडळ-३ मधील ई-१ व ई-२ विभागातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास रक्कम रु.१५,००,०००/- या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक - १३८.४ (२)**

विषय -उपमुख्य अभियंता-परिमंडळ-१ मधील अ विभागांतर्गत जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याबाबत. (दि.०१.०४.२०११ ते दि.३१.०३.२०१२) या कालावधीसाठी

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ८५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३८/१२११**

उपमुख्य अभियंता परिमंडळ-१ मधील अ विभागातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास रक्कम रु.३५००,०००/- या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक - १३८.४ (३)**

विषय -उपमुख्य अभियंता-परिमंडळ-१ मधील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ८७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३८/१२१२**

उपमुख्य अभियंता परिमंडळ१ मधील सी-१ विभागातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास रक्कम रु.३०,००,०००/- या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

उपमुख्य अभियंता परिमंडळ१ मधील सी-२ विभागातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास रक्कम रु.६७,००,०००/- या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

उपमुख्य अभियंता परिमंडळ१ मधील सी-३ विभागातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास रक्कम रु.५०,००,०००/- या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक - १३८.५**

विषय - शुध्दीपत्रक :- इ.क्र.२९ डोंगरशी रोड (बीयु लियु)

उारोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ८९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३८/१२१३**

इ.क्र.२९ डोंगरशी रोड (बीयु लियु), इमारतीचे क्षेत्रफळ १००८.८४ चौ.मी.दुरुस्तीचा दर रु.२५५८.७१ च्याऐवजी इमारतीचे क्षेत्रफळ १८५९.०० चौ.मी.व दुरुस्तीचा दर रु.१४६३.०७ असे वाचण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**बाब क्रमांक - १३८.६**

विषय - परिमंडळ-२ मधील दुरुस्ती कामाला प्रशासकीय मान्यतेवरील रक्कमेस मंजूरी मिळण्याबाबत. इ.क्र.३८-४२ (४२-४२ एफ) डॉकयॉर्ड रोड, माझगाव, टप्पा-२

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ९१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३८/१२१४**

इ.क्र.३८-४२ (४२-४२ एफ) डॉकयॉर्ड रोड, माझगाव, टप्पा-२ या इमारतीच्या दुरुस्ती कामाच्या मंजूर रक्कमेपेक्षा रु.४७,०६०/- इतक्या जास्तीच्या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १३८.७**

**पुनर्विकास**

विषय - मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

१. भूकर पहाणी क्र.१४८६, मांडवी विभाग, इ.क्र.६४-११८, नागपाडा क्रॉस लेन, मुंबई येथील **"रसूल बिल्डींग"**.

२. भूकर पहाणी क्र.३८६६ व ३८६७, भुलेश्वर विभाग, इ.क्र. ११६-११६ए व ११८-११८ए, डॉ.मित्रसेन माहिमतुरा मार्ग, मुंबई येथील **"जयराम भाना बिल्डिंग व रंभा बिल्डिंग"**.

३. भूकर पहाणी क्र.२९११, २९१९ व २९१९ व २९२० भुलेश्वर विभाग इ.क्र.३८-४०, इसलामपुरा स्ट्रीट मुंबई येथील **"जमनादास बिल्डींग"**.

४. भूकर पहाणी क्र.३७१०, भुलेश्वर विभाग, इ.क्र.१३४-१४०, बारा इमाम रोड, मुंबई येथील **"अकबर चेंबर्स"**.

५. भूकर पहाणी क्र. ४१०७ व ४१०८, भुलेश्वर विभाग, इ.क्र.८० व ७४-७८, बारा इमाम रोड, मुंबई येथील **"बिस्मिल्ला इमारत व हनिफा इमारत"**.

६. भूकर पहाणी क्र.२५५० व २५६०, भुलेश्वर विभाग, इ.क्र.१४-२० व १७ आणि ११-१५ मुंबई येथील **"बसार मंझील आणि ढोलकीया मेन्शन"**.

७. भूकर पहाणी क्र.२९१, गिरगांव विभाग, इ.क्र.२०-३४, मुगभाट क्रॉस लेन, गिरगाव, मुंबई येथील **"शिवपार्वती कृपा"**.

८. भूकर पहाणी क्रमांक ११४, गिरगांव विभाग, इ.क्र.२०६-२०८-२१२, खाडिलकर मार्ग, गिरगांव, मुंबई-४ येथील **'लिलावती मेन्शन'**.

९. भूकर पहाणी क्र.६१२ (भाग), गिरगाव विभाग, इ.क्र.४, २री दुभाष लेन, गिरगाव, मुंबई - ४ येथील **"मदन हाऊस"**.

१०. भूकर पहाणी क्र.३५९, माझगाव विभाग इ.क्र.१-१ए, ३-३ए हाथी बाग, डी.एन.सिंग रोड, माझगाव, मुंबई येथील **"न्यु आदमखान इमारत / आरसीवाला बिल्डिंग"**.

११. भूकर पहाणी क्र.१३९५ भायखळा विभाग, इ.क्र.२८-३०-३२, टँक स्ट्रिट, मुंबई येथील **"लदधा इब्राहिम चाळ"**.

१२. भूकर पहाणी क्र.१९७९ भायखळा विभाग, इ.क्र.६२०, ६२०ए व ६२०एल, बापूराव जगताप मार्ग, मुंबई येथील **"मुसा हाऊस"**.

१३. भूकर पहाणी क्र.१४७४, भायखळा विभाग, इ.क्र.३२-३६ व ३०ए रामचंद्र भट्टा मार्ग, मुंबई येथील **"नदीम हाऊस"**.

१४. भूकर पहाणी क्र.१७१४ भायखळा विभाग, इ.क्र.१४, सिद्दिक लेन, मोहम्मद उमर रज्जब रोड, मदनपुरा, मुंबई येथील **"जुनैद मंजिल"**.

१५. अंतिम भूखंड क्र.६७५,टी.पी.एस.क्र.३, माहिम विभाग, इमारत क्र.७६-एम व १५-ए, वांझेवाडी लेन, माहिम,मुंबई-१६ **'हनिफाबाई बिल्डींग'**.

१६. अंतिम भूखंड क्र.४००-टीपीएस-४-माहिम विभाग, इ.क्र. २६-२६ए,२१-२१एफ व ८१२, गोखले रोड, (दक्षिण), दादर, मुंबई २८ **'सुगी सदन'**.

१७. भूकर पहाणी क्र.४८८-ए/१०,माटुंगा विभाग, प्लॉट क्र.२९-ए, दादर-माटुंगा इस्टेट,इ. क्र.२७, के.ए.सुब्रमण्यम् रोड,माटुंगा,मुंबई-१९**'सरस्वती निवास'**.

१८. भूकर पहाणी क्र.१५०-डी/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.१६५-डी,दादर-माटुंगा इस्टेट,इ.क्र. ११०-ए, खारेघाट रोड, माटुंगा,(पूर्व) मुंबई-१९**'गणेश निकेतन'**.

१९. भूकर पहाणी क्र.५२७/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.७७८-दादर-माटुंगा इस्टेट,इ.क्र.२०, टिळक रोड,दादर,(पूर्व) मुंबई-१४**'होमी व्हिला सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित'**.

२०. भूकर पहाणी क्र.५/७६,दादर नायगांव विभाग,इ.क्र.१८५-बी, माधवदास पास्ता रोड,दादर-(पूर्व) मुंबई-१४ येथील **'अमिना मेन्शन'**.

२१. भूकर पहाणी क्र.५४,परेल शिवडी विभाग,इ.क्र.४४-६,व ७-सी, १२-बी,१२-सी,१४-४० व ८-१४, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,लालबाग,मुंबई-१२ येथील **'मोहंमदी चाळ १,२,३व पेरु चाळ क्र.११ व १२'**.

२२. भूकर पहाणी क्र.३५६ आणि ३५७ मांझगाव विभाग, इ.क्र.६ फोडकर बिल्डिंग आणि ८ शिरिन बिल्डिंग, हाथीबाग, डि.एन्.सिंग रोड, मुंबई-४०००१०.

२३. भूकर पहाणी क्र.४०९९, भुलेश्वर विभाग, इ.क्र.३५१-३५७, मौलाना आझाद रोड, मुंबई येथील **"हाशिम मंझील"**.

२४. भूकर पहाणी क्र.१०डी/१२४ माझगांव विभाग येथील इ.क्र.११५-२३-७७ आणि ११५अे, म्हातारपाखाडी स्ट्रीट, मुंबई.

२५. भूकर पहाणी क्र.७६४ भायखळा विभाग, इ.क्र.१६२ए, १६२बी, १३८-१५२ आणि १६०-१६६ एम.ए.रोड, मुंबई येथील **"कासममिया चाळ / कंदुरीचाळ / काथावाला चाळ"**.

२६. भूकर पहाणी क्र.६९१ व ६८९, गिरगांव विभाग, इ.क्र.१७ व १९, पारसीवाडा २री लेन, डी विभाग, मुंबई येथील **"पितांबर निवास" व "चंपा निवास"**.

२७. भूकर पहाणी क्र.१२५६ आणि १२५७ भायखळा विभाग, इ.क्र.२५, टेमकर स्ट्रीट आणि इ.क्र.२७,

टेमकर स्ट्रीट, मुंबई ०८.

२८. भूकर पहाणी क्र.३२०, भुलेश्वर विभाग, इमारत क्र.६-८-१० नानाभाई बायरामजी लेन, धोबी तलाव, मुंबई येथील **"कासानी इमारत"**.

२९. भूकर पहाणी क्र.१२६० भायखळा विभाग, इ.क्र.३७-३९, टेमकर स्ट्रीट, मुंबई ०८.

३०. भूकर पहाणी क्र.२९७५, २९७६, २९७७, २९७८ आणि २९७९ इ.क्र.२७, २९, ३१-३३ व ३५, २री कारपेंटर स्ट्रिट, मुंबई येथील **"जिवीबाई गोविंद बिल्डिंग, भगवानदास बिल्डिंग व पंड्या बिल्डिंग"**.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.९३ ते २२३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत, सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३८/१२१५**

मुंबई बेटावरील खालील ३० मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. भूकर पहाणी क्र.१४८६, मांडवी विभाग, इ.क्र.६४-११८, नागपाडा क्रॉस लेन, मुंबई येथील **"रसूल बिल्डींग"**.

२. भूकर पहाणी क्र.३८६६ व ३८६७, भुलेश्वर विभाग, इ.क्र. ११६-११६ए व ११८-११८ए, डॉ.मित्रसेन माहिमतुरा मार्ग, मुंबई येथील **"जयराम भाना बिल्डिंग व रंभा बिल्डिंग"**.

३. भूकर पहाणी क्र.२९११, २९१९ व २९१९ व २९२० भुलेश्वर विभाग इ.क्र.३८-४०, इसलामपुरा स्ट्रीट मुंबई येथील **"जमनादास बिल्डींग"**.

४. भूकर पहाणी क्र.३७१०, भुलेश्वर विभाग, इ.क्र.१३४-१४०, बारा इमाम रोड, मुंबई येथील **"अकबर चेंबर्स"**.

५. भूकर पहाणी क्र. ४१०७ व ४१०८, भुलेश्वर विभाग, इ.क्र.८० व ७४-७८, बारा इमाम रोड, मुंबई येथील **"बिस्मिल्ला इमारत व हनिफा इमारत"**.

६. भूकर पहाणी क्र.२५५० व २५६०, भुलेश्वर विभाग, इ.क्र.१४-२० व १७ आणि ११-१५ मुंबई येथील **"बसार मंझील आणि ढोलकीया मेन्शन"**.

७. भूकर पहाणी क्र.२९१, गिरगांव विभाग, इ.क्र.२०-३४, मुगभाट क्रॉस लेन, गिरगाव, मुंबई येथील **"शिवपार्वती कृपा"**.

८. भूकर पहाणी क्रमांक ११४, गिरगांव विभाग, इ.क्र.२०६-२०८-२१२, खाडिलकर मार्ग, गिरगांव, मुंबई-४ येथील **'लिलावती मेन्शन'**.

९. भूकर पहाणी क्र.६१२ (भाग), गिरगाव विभाग, इ.क्र.४, २री दुभाष लेन, गिरगाव, मुंबई - ४ येथील **"मदन हाऊस"**.

१०. भूकर पहाणी क्र.३५९, माझगाव विभाग इ.क्र.१-१ए, ३-३ए हाथी बाग, डी.एन.सिंग रोड, माझगाव, मुंबई येथील **"न्यु आदमखान इमारत / आरसीवाला बिल्डिंग"**.

११. भूकर पहाणी क्र.१३९५ भायखळा विभाग, इ.क्र.२८-३०-३२, टँक स्ट्रिट, मुंबई येथील **"लदधा इब्राहिम चाळ"**.

१२. भूकर पहाणी क्र.१९७९ भायखळा विभाग, इ.क्र.६२०, ६२०ए व ६२०एल, बापूराव जगताप मार्ग, मुंबई येथील **''मुसा हाऊस''**.

१३. भूकर पहाणी क्र.१४७४, भायखळा विभाग, इ.क्र.३२-३६ व ३०ए रामचंद्र भट्टा मार्ग, मुंबई येथील **''नदीम हाऊस''**.

१४. भूकर पहाणी क्र.१७१४ भायखळा विभाग, इ.क्र.१४, सिद्दिक लेन, मोहम्मद उमर रज्जब रोड, मदनपुरा, मुंबई येथील **''जुनैद मंजिल''**.

१५. अंतिम भूखंड क्र.६७५,टी.पी.एस.क्र.३, माहिम विभाग, इमारत क्र.७६-एम व १५-ए, वांझेवाडी लेन, माहिम,मुंबई-१६ **'हनिफाबाई बिल्डींग'**.

१६. अंतिम भूखंड क्र.४००-टीपीएस-४-माहिम विभाग, इ.क्र. २६-२६ए,२१-२१एफ व ८१२, गोखले रोड, (दक्षिण), दादर, मुंबई २८ **'सुगी सदन'**.

१७. भूकर पहाणी क्र.४८८-ए/१०,माटुंगा विभाग, प्लॉट क्र.२९-ए, दादर-माटुंगा इस्टेट,इ. क्र.२७, के.ए.सुब्रमण्यम् रोड,माटुंगा,मुंबई-१९**'सरस्वती निवास'**.

१८. भूकर पहाणी क्र.१५०-डी/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.१६५-डी,दादर-माटुंगा इस्टेट,इ.क्र. ११०-ए, खारेघाट रोड, माटुंगा,(पूर्व) मुंबई-१९**'गणेश निकेतन'**.

१९. भूकर पहाणी क्र.५२७/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.७७८-दादर-माटुंगा इस्टेट,इ.क्र.२०, टिळक रोड,दादर,(पूर्व) मुंबई-१४**'होमी व्हिला सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित'**.

२०. भूकर पहाणी क्र.५/७६,दादर नायगांव विभाग,इ.क्र.१८५-बी, माधवदास पास्ता रोड,दादर-(पूर्व) मुंबई-१४ येथील **'अमिना मेन्शन'**.

२१. भूकर पहाणी क्र.५४,परेल शिवडी विभाग,इ.क्र.४४-६,व ७-सी, १२-बी,१२-सी,१४-४० व ८-१४, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,लालबाग,मुंबई-१२ येथील **'मोहंमदी चाळ १,२,३व पेरु चाळ क्र.११ व १२'**.

२२. भूकर पहाणी क्र.३५६ आणि ३५७ मांझगाव विभाग, इ.क्र.६ फोडकर बिल्डिंग आणि ८ शिरिन बिल्डिंग, हाथीबाग, डि.एन्.सिंग रोड, मुंबई-४०००१०.

२३. भूकर पहाणी क्र.४०९९, भुलेश्वर विभाग, इ.क्र.३५१-३५७, मौलाना आझाद रोड, मुंबई येथील **''हाशिम मंझील''**.

२४. भूकर पहाणी क्र.१०डी/१२४ माझगांव विभाग येथील इ.क्र.११५-२३-७७ आणि ११५अे, म्हातारपाखाडी स्ट्रीट, मुंबई.

२५. भूकर पहाणी क्र.७६४ भायखळा विभाग, इ.क्र.१६२ए, १६२बी, १३८-१५२ आणि १६०-१६६ एम.ए.रोड, मुंबई येथील **''कासममिया चाळ / कंदुरीचाळ / काथावाला चाळ''**.

२६. भूकर पहाणी क्र.६९१ व ६८९, गिरगांव विभाग, इ.क्र.१७ व १९, पारसीवाडा २री लेन, डी विभाग, मुंबई येथील **''पितांबर निवास'' व ''चंपा निवास''**.

२७. भूकर पहाणी क्र.१२५६ आणि १२५७ भायखळा विभाग, इ.क्र.२५, टेमकर स्ट्रीट आणि इ.क्र.२७, टेमकर स्ट्रीट, मुंबई ०८.

२८. भूकर पहाणी क्र.३२०, भुलेश्वर विभाग, इमारत क्र.६-८-१० नानाभाई बायरामजी लेन, धोबी तलाव,

मुंबई येथील **"कासानी इमारत"**.

२९. भूकर पहाणी क्र.१२६० भायखळा विभाग, इ.क्र.३७-३९, टेमकर स्ट्रीट, मुंबई ०८.

३०. भूकर पहाणी क्र.२९७५, २९७६, २९७७, २९७८ आणि २९७९ इ.क्र.२७, २९, ३१-३३ व ३५, २री कारपेंटर स्ट्रिट, मुंबई येथील **"जिवीबाई गोविंद बिल्डिंग, भगवानदास बिल्डिंग व पंड्या बिल्डिंग"**

मा.मुख्य अधिकारी,दुवपु.मंडळ यांनी बैठकीत पुढीलप्रमाणे माहिती दिली. "संक्रमण शिबीरात रहाणा-या रहिवाशांची यादी, संक्रमण शिबीरातील रिक्त गाळ्यांची यादी, २२५/१८० चौ.फूटाच्या गाळ्यांची तसेच एन.ओ.सी.गाळ्यांची यादी, बृहतसूचीवर घेण्यात आलेल्या भाडेकरुंची यादी संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर यादी "Provisional list" म्हणून घोषित करण्यात आलेली आहे. सदर यादीतील माहीती तपासून दुरुस्तीची कार्यवाही करावी, तसेच दर महिन्याला सदर यादीतील माहीती अघयावत करणे, इ.जबाबदारी ही प्रत्येक कार्यकारी अभियंता व उपमुख्य अभियंता यांची आहे. तसेच एम.आय.एस.पूर्ण झालेले आहे, त्याची प्रत सर्व सन्मा.सदस्यांना देण्यात येईल असे सांगितले

ज्या ३३ प्रकरणांवर म्हाडा देयक्षेत्र खुल्या बाजारात विकली आहे त्या प्रकरणी कार्यकारी अभियंता यांनी पोलिस स्टेशनमध्ये जावून एफ.आर.आर. नोंदविणे आवश्यक आहे. सदर कार्यवाही ८ दिवसात पूर्ण करण्याच्या सुचना दिल्या.MIS व इतर सर्व माहिती संबंधित उपमुख्य अभियंता यांनी संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही नियमीत करावी." अशा सूचना देण्यात आल्या.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी धारावी संक्रमण शिबीरातील घुसखोरीबाबत निलंबीत करण्यात आलेल्या कर्मचा-यांवर व इतर कर्मचारी / अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली, याबाबत विचारणा केली. यावर मा.मुख्य अधिकारी,दुवपु.मंडळ यांनी असे सांगितले की, सदर प्रकरणी मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा. तसेच पोलिस स्टेशन यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कारवाई करण्यात येईल. तसेच माहिम संक्रमण शिबीरातील घुसखोरी काढल्यानंतर रिक्त झालेल्या गाळ्यांबाबत काय कार्यवाही करण्यात आली याबाबत श्री.तिवारी, कार्यकारी अभियंता यांनी सभागृहास माहिती दिली. धारावी बाबत चर्चा सुरु असताना सन्मा.सदस्य श्री.हरिष सणस यांनी धारावीसारख्या संवेदनशील विभागाकरीता कार्यकारी अभियंता श्री.तिवारी यांना अतिरिक्त कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्याबाबत सांगितले. सन्मा.सदस्य श्री.तारीक फारुकी यांनी पूर्वी काही चुका झाल्या आहेत त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले.

सन्मा.सदस्या श्रीमती उल्का पाटकर यांनी बोटावाला चाळीतील १६२ भाडेकरुंपैकी १३७ भाडेकरुंना ४ वर्षे झालीतरी व्हेकेशन नोटीस का दिलेल्या नाहीत, याबद्दल विचारणा केली. याबाबत श्री.जोशी, कार्यकारी अभियंता यांनी अशी माहिती दिली की, सदर भाडेकरुंना आपत्कालिन वितरण आदेश देताना मूळ व्हेकेशन नोटीस जमा करण्यात आलेल्या होत्या. त्याप्रमाणे आपत्कालिन आदेशावर त्याची नोंद आहे. सदर मूळ व्हेकेशन नोटीस हया उपमुख्य अधिकारी (सं.गा.) यांच्या कार्यालयाने जमा केलेल्या असल्याने सदर व्हेकेशन नोटीस देण्याचे काम हे उपमुख्य अधिकारी (सं.गा.) यांचे अखत्यारित येते. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी श्री.गोटे, उपमुख्य अधिकारी (सं.गा.) यांना असे आदेश दिले की,त्यांनी जानेवारी, २०१० पूर्वी जे वितरण झालेले आहे, त्या सर्व भाडेकरुंच्या नस्त्या आपल्याच कार्यालयात असल्याने त्या नस्त्यांची योग्यप्रकारे तपासणी करावी. त्यावरुन सन-२०१० पूर्वीच्या आढळून न आलेल्या/ गहाळ झालेल्या नस्त्यांची यादी तयार करुन ती कार्यकारी अभियंता यांचेकडे पाठवावी. जेणेकरुन जे भाडेकरु संक्रमण

शिबीरात रहातात त्यांचेकडून किती मासिक भाडे आकारावयाचे ते समजू शकेल व त्याप्रमाणे त्यांचेकडून मासिक भाडे आकारता येईल.

सन्मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी डी-३ चौपाटी रोड येथील धोकादायक इमारतीबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी, असे सांगितले. यावर मा.मुख्य अधिकारी,दुवपु.मंडळ यांनी श्री.गडकरी, कार्यकारी अभियंता यांना धोकादायक इमारतींबाबत लवकरात लवकर आवश्यक ती कार्यवाही करावयाचे आदेश दिले.

श्री.आर्गेकर, उपमुख्य अभियंता (परिमंडळ-२) यांनी उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबात विषय आयत्यावेळी घेण्याबाबत सर्व सन्मा.सदस्यांना विनंती केली. त्यास सर्व सन्मा.सदस्यांनी एकमताने अनुमती दिली व आयत्यावेळचे विषय बैठकीत ठेवण्यात आले.

<u>आयत्यावेळेचे विषय</u>

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-१ मधील (सी-१,सी-२,सी-३ विभाग) ०६ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. २५५ ते २६३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३८/१२१६**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०६ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१,४१,०३,८०३/-(रुपये एक कोटी,एक्केचाळीस लक्ष, तीन हजार,आठशे तीन फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.७८,७३,३९२/- (रुपये अठ्ठयाहत्तर लक्ष, त्र्याहत्तर हजार, तीनशे ब्याण्णव फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-४ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-४ मधील (ग/उ,फ/उ,फ/द विभाग) १४ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.२६५ ते २७३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३८/१२१७**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १४ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.३,७७,६१,३९८/-(रुपये तीन कोटी,सत्तयाहत्तर लक्ष, एकसष्ट हजार,तीनशे अठ्ठयाण्णव

फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.२,०६,४७,४७२/- (रुपये दोन कोटी, सहा लक्ष, सत्तेचाळीस हजार, चारशे बहात्तर फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-३ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-३ मधील (ब व इ-२ विभाग) १३ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.२७५ ते २८३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३८/१२१८**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १३ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,०५,५२,००२/-(रुपये दोन कोटी, पाच लक्ष, बावन्न हजार,दोन फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,२७,१९,४३०/- (रुपये एक कोटी,सत्तावीस लक्ष, एकोणीस हजार, चारशे तीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी व्हेकेशन नोटीसच्या प्रस्तावाबाबत काय झाले, अशी विचारणा केली. त्यावर श्री.गोटे, उपमुख्य अधिकारी (सं.गा.) यांनी असे सांगितले की, टिप्पणी विधी सल्लागार/प्राधिकरण यांचेकडे पाठविलेली आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सारस्वत बँकेमार्फत जी भाडेवसुली होत आहे, त्यास प्रतिसाद कसा मिळतो, याबद्दल विचारणा केली. त्यावर संबंधित कार्यकारी अभियंता यांनी प्रतिसाद चांगला आहे, असे सांगितले. तसेच भाडेवसुलीबाबत ३ टक्के सवलत द्यावयाची आहे, तो प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यात आलेला आहे, त्याचा योग्य तो पाठपुरावा करावा व सदर प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर त्याची प्रत सर्व सन्मा.सदस्यांना देण्यात यावी, असे श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांना मा.मुख्य अधिकारी यांनी आदेश दिले.

सन्मा.सदस्य श्री.सुबोध बांदिवडेकर यांनी इमारत पूर्णपणे पाडण्यात येवूनसुध्दा ३०/३० महिने उलटून गेलेतरी पुर्नविकासाचे काम सुरु करण्यात येत नाही,याबद्दल विचारणा केली असता मा.मुख्य अधिकारी,दुवपु.मंडळ यांनी सन-२००४ पूर्वीच्या सर्व एन.ओ.सी.धारकांना त्यांची एन.ओ.सी.का रद्द करण्यात येवू नये, अशा नोटीसा पाठविण्याच्या सर्व कार्यकारी अभियंता यांना सूचना दिल्या.

सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनी बोटावाला चाळ,प्रभादेवी येथील पुनर्विकासाबाबत प्रश्न उपस्थित केला, त्याबाबत श्री.सेठ, कार्यकारी अभियंता,ग/द विभाग यांनी असे सांगितले की, कागदपत्रे सादर करण्याच्या सूचना विकासकास देण्यात आल्या आहेत, असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मंगलवाडी येथील योजनेमध्ये खिडक्या लावण्याबाबतच्या प्रस्तावाचे काय झाले याबद्दल विचारणा केली असता, सदर प्रस्तावावर वित्त नियंत्रक/प्रा.यांनी काही शेरे

घेतले असून त्याची पूर्तता उपमुख्य अभियंता यांचेकडून करण्यात येत असल्याबद्दल मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी दि.१ एप्रिल, २०१० पासून संक्रमण शिबीरात रहाणारे भाडेकरु वाढीव दराने मासिक भाडे भरत आहेत किंवा नाही, किती वसुली झालेली आहे, याची माहिती देण्यास सांगितले. याबाबत मा.मुख्य अधिकारी यांनी श्री.गोटे, उपमुख्य अधिकारी (सं.गा.) व संबंधित कार्यकारी अभियंता यांनी अशा प्रकारचा तक्ता [विवरणपत्र] तयार करुन पुढील बैठकीत घेवून यावा, अशा सूचना दिल्या.

संक्रमण शिबीरात वर्षानुवर्ष रहात असलेल्या भाडेकरुंना बृहत्सूचीवर घेण्याकरीता जी नियमावली बनविलेली आहे. त्याप्रमाणे पात्र व बृहत्सूचीवर येण्यास इच्छुक असलेल्या रहिवाशांना रितसर बृहत्सूचीवर घेण्यात येईल. ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरु करावी अशा सुचना दिल्या त्याकरीता तयार करण्यात आलेले शेडयूल [कार्यक्रम] पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर करावी, अशा सूचना मा.मुख्य अधिकारी यांनी श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांना दिल्या.

बैठकीच्या अखेरीस मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.

सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता,
मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,
मुं.इ.दु.व पु.मंडळ